# प्रास्ताविक व भूमिका

ग्रामीण साहित्य असे ज्याला म्हटले जाते त्या नावाखाली लिहिले जाणारे साहित्य आत्मिक अविष्कार आणि वास्तव जीवन याचा संलग्न विचार व्यक्त होऊन लिहिले जाणारे साहित्य असते. ग्रामीण लेखक त्या साहित्याची निर्मिती करताना त्या वातावरणाशी, त्या माणसांशी, त्यांच्या विचारांशी, त्यांच्या मनाशी एकूणच त्याच्या संपूर्ण जीवनाशी एकरूप झालेला असतो. स्वातंत्र्योत्तर नवसाहित्याच्या काळात ग्रामीण साहित्याचा वेगळा असा ठसा विविध वाङ्मय प्रकारातून सर्वसामान्य वाचकांच्या मनावर बिंबला गेला. पुढे १९६० नंतर या साहित्याला बरे दिवस आले. साहित्य संमेलन, चर्चासत्र, परिसंवाद यातून ग्रामीण साहित्यावर विचार मांडला जाऊ लागला. ग्रामीण साहित्याला योग्य ती दाद मिळू लागली. समीक्षेच्या क्षेत्रात त्याचा विचार होऊ लागला आणि या साहित्यावर प्रेम करणारा रसिक वाचक या ग्रामीण साहित्याच्या स्वागतासाठी सज्ज झाला.

तसे पाहिले तर ग्रामीण साहित्यावर म्हणावी तेवढी समीक्षा आजपर्यंत लिहिली गेली नाही. पण अलिकडे या साहित्यावर चांगल्या प्रकारची समीक्षा लिहिली जाऊ लागली आहे. डॉ. आनंद यादव यांना त्याचे श्रेय द्यावे लागेल. तो प्रचार अनेकानी आज पर्यंत पुढे चालविण्याचा प्रयत्न केला आहे. नुकताच प्रा. चंद्रकुमार नलगे संपादित 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' ही लिहिला गेला आहे.

स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्याच्या नवकाळात ग्रामीण कथेला व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेच्या रूपाने प्रचंड स्वरूपात यश मिळू लागले. आशय आणि अभिव्यक्ती अशा विविध गुणवैशिष्ट्यांनी ती नटली. कथेने प्रचंड स्वरुपात ग्रामीण साहित्यात भर घातली व तिची योग्य ती दखल घेतली गेली. पण स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण कथेचा योग्य तो विचार आजपर्यंत केला गेला नाही. अभ्यासकांचा या कथेकडे पाहण्याचा दृष्टिकोन म्हणजे तिचे स्वरुप सांकेतिक, शोभादायक व सत्वहिन म्हणण्यापर्यंत जातो ते माडगूळकरानी मराठी कथेत मन्वंतर घडविले असे म्हणतात. त्यांचे म्हणणे पूर्ण मान्य करण्यासारखे असले तरी नवकथेच्या पूर्वीच्या ग्रामीण कथेने उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखविण्याचे केलेले कार्य लक्षणीय आहे. तर प्रादेशिक चित्रणातील विशिष्ट प्रदेश व तेथील माणसे मनाची पकड घेतात. त्या ग्रामीण कथेचा अभ्यास करावा हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन व म. भा. भोसले

यांच्या कथेचा अभ्यास करण्याचे ठरविले आणि एम् .फिल (मराठी) या पदवी परीक्षेसाठी 'म. भा. भोसले यांच्या कथालेखनाचे विशेष' या अभ्यास विषयाची निवड केली.

त्याचबरोबर मी ग्रामीण भागात जन्माला आलो असल्याकारणाने मला ग्रामीण मातीविषयी आणि तिथल्या माणसाविषयी अत्यंत प्रेम आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विशेषत: बी.ए. च्या तिसऱ्या वर्गात असताना मी व्यंकटेश माडगूळकर व शंकरराव खरात यांच्या कथांचा अभ्यास केला. तेव्हापासून ग्रामीण कथा वाचण्याची मनात आवड निर्माण झाली. नंतर बऱ्याच ग्रामीण कथा मी वाचल्या. साहजिकच ग्रामीण कथेविषयी मनात अधिक गोडी निर्माण झाली. पुढे ग्रामीण साहित्याचे अध्यापन करत असताना चारूता सागरांच्या कथेविषयी मनात एक वेगळ्याच प्रकारचे आकर्षण निर्माण झाले. त्या कथेत आपल्या माणसांचे जीवन, त्यांचा स्वभाव, मुक्या प्राण्यावरील प्रेम, अंधश्रद्धा, ग्रामीण निसर्ग याचे चित्रण आले आहे. मी चारूता सागरांच्या गावापासून जवळच रहात असल्याने त्यांच्या कथेतील सामर्थ्य माझ्या चटकन लक्षात आले. तसेच या परिसरात वावरताना कथेविषयी तर आकर्षण निर्माण झालेच पण आपल्या परिसरातील आणखी एका उपेक्षित ग्रामीण कथाकाराची जाणीव मला झाली ते म. भा. भोसले होत.

ज्या परिसरात भोसले यांची कथा रूजली त्या परिसरातच नव्हे तर कितीतरी दुरवरच्या माणसांची मने त्यांच्या कथेने जिंकून घेतली. वि. स. खांडेकर, प्रा. ना. सी. फडके यांच्या काळात खेड्यात राहून कोणतीही साधने उपलब्ध नसताना आपली हौस म्हणून अंत:प्रेरणेने त्यांनी कथा लेखन केले आहे.

म. भा. भोसले यांच्या कथेविषयी विचार मांडण्यापूर्वी मी ग्रामीण कथा म्हणजे काय ? ग्रामीणत्व म्हणजे काय ? याचा विचार करून मराठी ग्रामीण कथेचा उदय व विकास हा विचार मांडला आहे.

भोसले यांच्या कथेचा अभ्यास करताना त्यांच्याविषयी व त्यांच्या वाङ्मयाविषयी मी सखोल माहिती मिळविली. त्यांचे वाङ्मय विपुल असल्याने व ते स्वत: ग्रामीण परिसरात जन्मले असल्याने त्यांना या मातीविषयी नितांत प्रेम आहे. तिच्यावर त्यांची निष्ठा आहे. या आधारेच त्यांनी आपल्या विविध कलाकृतींची निर्मिती केली आहे.

त्याच बरोबर त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व काय आहे ? स्वातंत्र्यपूर्व काळात शहरी जीवनापासून दूर राहून वाचनाच्या अधारे कमी शिक्षणाच्या बळावर स्वत:च्या मनातील विचार व्यक्त करण्याची त्यांची धडपड त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीतून पहावयास मिळते. त्याचबरोबर त्यांच्या वाङ्मयीन प्रेरणा काय आहेत, त्यांच्यावर कोणत्या विचारांचा व साहित्याचा प्रभाव पडला हे मी दुसऱ्या प्रकरणातून मांडले आहे.

म. भा. भोसले यांच्या 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या दोन कथा संग्रहातील कथेचा आशय व अभिव्यक्तिदृष्टया विचार तिसऱ्या प्रकरणातून मांडला आहे. भोसले यानी आपल्या कथेतून ग्रामीण भागातील लोकांचे चित्रण तर केलेच पण ते जीवन त्यांनी जवळून पाहिले, अनुभवले व वास्तवाचे भान राखून ते मांडण्याचा प्रयत्न केला. याचा विचार या प्रकरणातून मांडला आहे.

भोसले यांच्या कथेचा आवाका तसा मोठा आहे. सांगली जिल्ह्यातील (जुना द. सातारा) भिलवडीच्या परिसरात त्यांची कथा फुलली आहे. शहरी जीवनापासून दूर असणाऱ्या या खेड्यात ज्ञानदानाचे कार्य करत असताना त्यांनी लेखन केले आहे. त्यावेळी कृ. बा. बाबर सारख्या लेखक गुरूचा त्यांच्यावरील प्रभाव महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या कथेचे यशापयश बऱ्याच गोष्टीवर अवलंबून आहे. त्याच बरोबर त्यांचे वाङ्मयीन स्थान काय आहे याचा विचार प्रबंधिकेच्या चौथ्या प्रकरणात केला गेला आहे.

उपसंहाराच्या पाचव्या प्रकरणात म. भा. भोसले यांच्या कथेविषयी विविध बाबींची चर्चा केली आहे. लेखकाचे व्यक्तिमत्व ज्या स्वरुपात जाणविले, जीवन जगताना त्यांना जे अनुभव आले याचा विचार ही केला गेला आहे.

शेवटी भोसले यांची मुलाखत, त्यांच्या ग्रंथांची संदर्भसूची व त्यांचे वाङ्मय अशी परिशिष्टे जोडली आहेत.

सारांश आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासात ग्रामीण कथेला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने ग्रामीण कथेचा अभ्यास करण्यात मला मनस्वी आनंद होत आहे. ज्या मातीत आपण जन्मलो त्या मातीचे ऋण कशाने फेडावे या विचारातच मला ग्रामीण क्षेत्र जवळचे वाटले तेव्हा त्याचाच विचार करायचा हे ठरवून मी पुढे वाटचाल आरंभली आहे.